दिनांक १२/०६/२०१९

**प्रेसनोट**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**"महिलेचा पाठलाग करून, अश्लिल चाळे करुन पळुन गेलेल्या इसमास दत्तवाडी पोलीसांनी केली अटक"**

बरेचसे नागरीक स्वतःची प्रकृती ठणठणीत राहावी या करीता सकाळ संध्याकाळ पायी चालणे, पळणे, योगा, व्यायाम करत असतात. त्याच प्रमाणे सहकारनगर नं.२ येथील एक महिला सकाळी शाहु कॉलेज येथे पायी चालण्यासाठी गेल्या असतांना,एक इसम त्यांच्याकडे पाहुन अश्लिल हावभाव करुन पाठलाग करत होता. त्यावेळी तेथे भरपुर लोक असल्यामुळे त्यावेळी तो पळुन गेला. त्याच्याबाबत माहिती घेतली असता तो इसम बाबु शेख,रा.जनता वसाहत असे असल्याचे समजले.

ती महिला परत संध्याकाळी तळजाई येथुन पायी फिरूनघरीजात असताना तोच इसम पुन्हा त्यांचा पाठलागकरत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनतर तो त्यांच्याकडे पाहुन अश्लिल चाळे करत होता. तेव्हा त्या महिलेने त्याच्याकडे दुर्लक्ष केले म्हणुन त्याने दगड फेकुन,त्या महिलेच्या पायाला मारुन जखमी करुन तेथुन पळुन गेला. सदर महिला दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे आल्या व त्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक,देविदास घेवारे यांना भेटल्या. त्या महिले सोबत घडलेली घटना महिला पोलीस उप निरीक्षक, प्रणिता हजारे यांचेकडुन समजावुन घेतली. त्यामहिलेने दिलेल्या फिर्यादी प्रमाणे गुन्हा दाखल करुन घेण्यात आला. गुन्हा नोंदवल्या नंतर त्याचे पुर्ण नाव पत्ता नसल्याने त्याचा पोलीसांनी जनता वसाहत येथे शोध घेतला परंतु त्याचेबाबत काही माहिती मिळुन येत नव्हती.

परंतु दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,देविदास घेवारे यांनी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी स्थापन केलेले "भरोसा सेल" चे उद्दिष्ट डोळ्यां समोर ठेवुन व त्या महिलेला भरोसा देण्यासाठी दत्तवाडी पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक,कुलदिप संकपाळ, पोलीस हवालदार,तानाजी निकम, पोलीस कॉन्स्टेबल,अभिजित कळसकर, शिवाजी क्षीरसागर असे छोटे पथक तयार करुन जनता वसाहत याठिकाणी बाबु शेख नावाच्या इसमाची माहिती काढण्यासाठी रवाना केले. वरील स्टाफने जनता वसाहत येथील गुप्त बातमीदारांना सक्रिय करुन बाबु शेख बाबत माहिती घेतली असता,तो गल्ली न.७७ जनता वसाहत वरचा टप्पा याठिकाणी असुन,त्याचे वर्णनाची माहिती घेतली. त्या पथकाने मिळालेल्या माहिती सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता,बाबु शेखच्या घेतलेल्या वर्णनाप्रमाणे खात्री केली असता,तो गल्ली नं.७७ येथे मिळुन आला. त्याच्याकडे नाव पत्ता विचारता त्याने नाव अब्दुल रहिम ऊर्फ बाबु शरफुद्दीन शेख,रा.पुणे हा तिच्याकडे हल्ली रा.सी-२-१२, शिवशंकर सोसायटी, केके मार्केटमागे, बिबवेवाडी पुणे असे असल्याचे सांगितले व सदर महिलेने दिलेल्या फिर्यादी मधील आरोपी असल्याची खात्री झाल्याने व त्याने गुन्हा कबुल केल्याने त्यास दाखल गुन्ह्यात अटक करुन,त्यास दि.११/०६/२०१९ रोजी मे.न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयीन कस्टडी मंजुर केल्याने त्यास पोलीस नाईक,मंगेश खेडकर व किरण रासकर यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे दाखल केले आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर.